# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १०/एनजीपी/संकीर्ण/२०१९/ १३११

दिनांक : 03 DEC 2019

प्रति,

१. संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

२. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

विषय : सारथीमार्फत चालवण्यात येणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमांबाबत.

संदर्भ : १. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे यांचे पत्र दिनांक : ११.११.२०१९.
२. या संचालनालयाचे परिपत्र क्र. १०/एनजीपी/संकीर्ण/२०१९/१६८००/१२३३, दिनांक : १५.११.२०१९.
३. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे यांचे पत्र दिनांक : १६.११.२०१९.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्रमांक १ वरील पत्राच्या अनुषंगाने, संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ वरील परिपत्रकान्वये, आपणांस कळविण्यात आलेले होते की, सदर पत्र सर्व संस्था प्रमुखांच्या निदर्शनास आणून आपल्या अखत्यारीत असणाऱ्या इच्छुक तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांना सारथीला परस्पर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात यावे.

तथापि, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे यांना त्यांच्या संदर्भ क्रमांक ३ वरील पत्रान्वये कळविलेले आहे की, संदर्भ क्रमांक १ वरील दिनांक ११.११.२०१९ रोजीचे पत्र रद्द समजण्यात यावे व त्याऐवजी खालील सुधारित मजकूर खालील प्रमाणे नमूद केलेला आहे.

"तंत्रशिक्षण संचालनालयातंर्गत विविध शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांमध्ये, कौशल्य विकास अंतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रम राज्यात घेतले जातात. परंतु सारथीच्या लक्षित गटातील काही उमेदवार गुणवत्ताधारक असूनही आर्थिक स्थितीमुळे त्यांचा फायदा घेऊ शकत नाहीत. तरी सदर शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सध्या सुरु असणारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम, त्यांचा कालावधी, कारण्यात येणारे शुल्क, प्रशिक्षणानंतर नोकरी/ रोजगाराची शक्यता इ. बाबतची माहिती सारथीला उपलब्ध करुन दिल्यास, सारथीमार्फत काही गरजू व गुणवता धारक उमेदवारांना ठराविक प्रशिक्षणासाठी प्रायोजित (प्रशिक्षणाचे शुल्क, राहण्याचा व जेवणाचा खर्च इ. सारथी मार्फत) करता येईल किंवा कसे, याबाबत विचार करता येईल. तरी आपल्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांना याबाबतची माहिती सारथीला उपलब्ध करण्याविषयी आपल्या स्तरावरुन सूचना दिल्यास यास चांगला प्रतिसाद मिळेल. म्हणून त्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यास विनंती आहे."

तरी, उपरोक्त बाबीची नोंद घेऊन त्यानुसार आपल्या अखत्यारितील सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यांना आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

---

पृष्ठांकन क्रं./तंशिस/विकाना/शैवि /2019 /3617
दिनांक:- 5 DEC 2019

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर

नागपूर विभागातील सर्व शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालयानी उपरोक्त पत्रात नमूद केल्या प्रमाणे कार्यवाही करावी.

**(डॉ.राम निबुदे)**
**प्र.सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर**

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

बालचित्रवाणी, गोपाळ गणेश आगरकर रोड, संभाजी ब्रायट रोडच्या मागे, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

Email ID : md.sarthi@maharashtra.gov.in | CIN-U74999PN2018NPL177594 | Website : www.sarthi-maharashtragov.in


जा.क्र. कौ.वि.वि/तज्ञबैठक/२०१९-२०/८१९ दि. १८/११/२०१९

18 NOV 2019

आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

प्रति,
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : सारथी, पुणे यांचेकडून कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत यापूर्वी करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराबाबत स्पष्टीकरण.

संदर्भ : सारथी, पुणे यांचे पत्र क्र. कौ.वि.वि. / तज्ञ बैठक/२०१९-२०/७५१ दि. ११ नोव्हेंबर, २०१९.

महोदय,

कृपया सारथी, पुणे यांचे संदर्भिय पत्राचे अवलोकन व्हावे, ही विनंती. सदरचे पत्र आपल्या कार्यालयाकडून www.dtemaharshtra.gov.in वर notifications या ठिकाणी अपलोड करण्यात आले असून त्यातील तपशील चुकीचा असल्याने कृपया त्याला सत्वर हटविण्यात यावे, ही विनंती.

१. या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त संदर्भित पत्रानुसार सारथी, पुणे यांनी तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत असणाऱ्या विविध तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांविषयी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून माहिती घेणे अभिप्रेत आहे. मात्र, सदर पत्रातील दुसऱ्या परिच्छेदामधील टायपिंग चुकांमुळे त्याबाबत गैरसमज होऊ नये व उमेदवारांना चुकीची माहिती जाऊ नये, यासाठी सदरचे पत्र रद्द समजण्यात यावे. सुधारित मजकूर खालील प्रमाणे आहे.

२. तंत्रशिक्षण संचालनालयातंर्गत विविध शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांमध्ये कौशल्य विकास अंतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रम राज्यात घेतले जातात. परंतु सारथीच्या लक्षित गटातील काही उमेदवार गुणवत्ताधारक असूनही आर्थिक स्थितीमुळे त्यांचा फायदा घेऊ शकत नाहीत. तरी सदर शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सध्या सुरु असणारे विविध प्रशिक्षण कार्यक्रम, त्यांचा

P.T.O.

कालावधी, आकारण्यात येणारे शुल्क, प्रशिक्षणानंतर नोकरी / रोजगाराची शक्यता, इ. बाबतची माहिती सारथीला उपलब्ध करून दिल्यास, सारथीमार्फत काही गरजू व गुणवत्ता धारक उमेदवारांना ठराविक प्रशिक्षणासाठी प्रायोजित (प्रशिक्षणाचे शुल्क, राहण्याचा व जेवणाचा खर्च, इ. सारथी मार्फत) करता येईल किंवा कसे, याबाबत विचार करता येईल. तरी आपल्या अंतर्गत कार्यरत असणा-या शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यांना याबाबतची माहिती सारथीला उपलब्ध करण्याविषयी आपल्या स्तरावरुन सूचना दिल्यास यास चांगला प्रतिसाद मिळेल. म्हणून त्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यास विनंती आहे.

४. या संदर्भात असे आणखी स्पष्ट करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालया अंतर्गत येणा-या सर्व शासकीय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये येथे राबविण्यात येणा-या विविध कौशल्य विकास कार्यक्रमांचा प्रस्ताव मागवून या तंत्रनिकेतने व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये यांमध्ये सुरु असलेल्या विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सध्या शिकत असलेल्या उमेदवारांचा प्रशिक्षण खर्च व निवास-भोजन व्यवस्थेचा खर्च सारथीकडून देणे अभिप्रेत नसून उपरोक्त परिच्छेद ३ मधील नमूद तपशीला प्रमाणे माहिती घेणे अभिप्रेत आहे.

तरी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्यानुसार शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यांना सुचित करण्यात यावे, ही विनंती.

झालेल्या असुविधा व तसदींबद्दल मना पासुन दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे.

शुभेच्छा सह

आपला विश्वासू

(डी. आर. परिहार)
व्यवस्थापकीय संचालक
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण
व मानव विकास संस्था, पुणे